महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# अऊदा प्रकल्प नि. संवसु परिमंडळ, नाशिक.
## अऊदा संवसु मंडल,नाशिक
## अंतर्गत अधिसुचना (Internal Notification)
### जाहीरात क्र १/२०१७

अउदा प्रकल्प नि. संवसु परिमंडळ, नाशिक अंतर्गत मंडल कार्यालयामधुन खालील नमुद अनुशेषनिहाय **वरिष्ठ यंत्रचालक** यांची पदे अंतर्गत अधिसुचनेव्दारे भरणेकरीता महापारेषण कंपनीत कार्यरत असणा-या पात्रताधारक तांत्रिक वर्ग ३ व ४ कर्मचा-यांमधुन सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे

**०१. मंडलस्तरीय वरिष्ठ यंत्रचालक या पदांचा संवर्गनिहाय अनुशेष खालीलप्रमाणे.**

| पदाचे नांव | | वरिष्ठ यंत्रचालक | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क. | मंडलाचे नांव | अनु. जमाती | विजा अ | इमाव | खुला | एकुण | शेरा |
| ०१ | अऊदा संवसु मंडल, नाशिक | ०१ | ०० | ०१ | ०३ | ०५ | |
| ०२ | अऊदा संवसु मंडल, भुसावळ | ०१ | ०१ | ०१ | ०३ | ०६ | |
| | एकुण | ०२ | ०१ | ०२ | ०६ | ११ | |

**०२. शैक्षणिक अर्हता :-**

| | | |
|---|---|---|
| ०१. | पदाचे नाव | वरिष्ठ यंत्रचालक |
| ०२. | वेतनश्रेणी | रू. १४५००-६५०-१७७५०-६७५-२४५००-७१०-४०१२० |
| ०३. | शैक्षणीक अर्हता | डिप्लोमा इन ईलेक्ट्रीकल इंजीनिअरिंग (Diploma in Electrical Engineer from State Council of Technical Education of Maharashtra State or its equivalent.) |
| ०४. | अनुभव | अनुभवाची आवश्यकता नाही. (No experience is necessary) |

**०३. निवड पध्दती :-**

अ. उमेदवाराची निवड ही लेखी परिक्षेत प्राप्त केलेले गुण व मागील पाच वर्षाच्या गोपनिय अहवालातील सरासरी मुल्यांकन हे एकत्रीत करून निवड यादी प्रसारीत केली जाईल.

ब. कोठल्याही प्रकारचे वैयक्तीक मुलाखत घेतली जाणार नाही.

**०४. वय मर्यादा :-**

अ. लागु नाही

**०५. आरक्षण :-**

अ. अर्जात दर्शविलेल्या जाती संबंधीचा पर्याय/प्रवर्ग बदलता येणार नाही.

ब. मागासवर्ग प्रवर्गातील कर्मचारी/अर्जदार यांनी अर्जासोबत महाराष्ट्र शासनाच्या सक्षम अधिका-याने दिलेले आपल्या मुळजातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाण पत्र जोडणे आवश्यक राहील

**०६. परिक्षा केंद्र :-**

पात्र कर्मचारी/अर्जदार यांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. आपणास परिक्षेचा दिनांक, वेळ व स्थळ आपण अर्जात नमुद केलेल्या ई-मेल वर काळविण्यात येईल, लेखी परिक्षेस आपणास स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

## सर्वसाधारण अटी

०१. निवड यादी ही परिमंडळ स्तरावर तयार केली जाईल आणि यादीतील उमेदवारांना मंडळ निहाय रिक्त पदे व अनुशेष विचारात घेऊन या परिमंडळातील कार्यक्षेत्रात कोणत्याही मंडलाअंतर्गत पदस्थापना करण्यात येईल.

०२. वरील पदांसाठी मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

०३. एखादया उमेदवाराने जाणुन बुजुन खोटी अगर चुकीची माहिती दिल्याचे आढळल्यास तो नेमणुकीसाठी अपात्र ठरेल. तसेच त्यांची नेमणुक झाली असल्यास कंपनीच्या सेवाविनिमयानुसार नेमणुक रदद करून त्याच्या शिस्तभंग कार्यवाही करण्यात येईल.

०४. अधिसुचनेमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांच्या संख्येत अथवा आरक्षणात बदल होत असल्यास त्याबाबत कोणत्याही उमेदवारास बदलाची सुचना उमेदवारास कळविण्यात येणार नाही.

०५. निवडी संबंधात निवड समितीने घेतलेला निर्णय हा अंतिम राहील. त्याबाबतीत कोणताही वैयक्तीक/कार्यालयीन पत्रव्यवहार केला जाणार नाही.

०६. टपाल खात्याच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच लेखी परिक्षा पत्र इत्यादी लेखी परिक्षा संपल्यानंतर किंवा उशिराने मिळाल्यास इत्यादी कारणासाठी उमेदवारांच्या पत्रव्यवहाराला कोणत्याही प्रकारचे प्रतिसाद दिला जाणार नाही. तसेच कार्यालयास उशिराने प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही व योग्य त्या नियंत्रण अधिका-यांमार्फत प्राप्त न झालेल्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही याचीही नोंद घ्यावी.

०७. उमेदवारांनी अंतर्गत अधिसुचनेसोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज हा काळया शाईच्या पेनानेच भरावा. सदरचा अर्ज योग्य त्या नियंत्रण अधिका-यांमार्फतच सादर करावयाचे आहे. तसेच अर्जात नमुद केल्यानुसार सेवा तपशिल व मागील ५ वर्षाचे गोपनिय मुल्यांकन त्यांच्या संबंधीत कार्यालयाने प्रमाणीत केलेला असला पाहीजे. तसेच अर्जाच्या नमुन्यात दर्शविलेले सर्व रकाने/स्तंभ त्यात दिलेल्या सुचनांनुसार भरणे आवश्यक आहे. चुकीचे अथवा खाडाखोड असलेले अर्ज बाद करण्यात येतील.

०८. अर्जाच्या विहीत नमुन्यात उमेदवाराने एकदा जातीचा प्रवर्ग नमुद केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारचा बदल केला जाणार नाही. किंवा एखाद्या मागासवर्गीय कर्मचा-याने खुल्या प्रवर्गासाठी अर्ज केला असल्यास किंवा तसा विकल्प दिला असल्यास नंतर त्यामध्ये बदल करता येणार नाही. **तसेच उमेदवार मागसवर्गीय प्रवर्गाचा असल्यास त्याने खुल्या प्रवर्गातुन अर्ज केला असल्यास त्यास सुध्दा महापारेषण कंपनीचा कार्यरत कर्मचारी या नात्याने जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील तसे न केल्यास त्यांचा उमेदवारी अर्ज विचारात घेतला जाणार नाही.**

०९. कर्मचारी/अर्जदार यांच्यावर शिस्तभंग कार्यवाही चालु असल्यास किंवा प्रस्तावित असल्यास अथवा शिस्तभंग कार्यवाहीची शिक्षा भोगत असल्यास उमेदवारी अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१०. कर्मचा-यांची निवड/पात्रता ही शिस्तभंग कार्यवाही अहवाल/ वार्षिक गोपनीय अहवाल /लेखी परिक्षा गुणवत्ता यादी तसेच इतर सेवा तपशिल यावर अवलंबुन असेल याबाबत वैयक्तिक अर्ज / निवेदन याचा विचार केला जाणार नाही.

११. शैक्षणीक अर्हता, शाळा सोडल्याचा दाखला, वय, जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र तसेच अपुर्ण भरलेला अर्ज किंवा आवश्यक ती कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती अर्जासोबत न जोडल्यास सदर कर्मचा-याचा अर्ज बाद ठरविण्यात येईल.

### अर्ज पाठविण्याचा पत्ता :-

**पोस्ट बॉक्स क्र. २५४ नाशिकरोड पिन कोड नं ४२२१०१** येथे **अंतिम तारखेपर्यत म्हणजेच दि. २०.०२.२०१७** पर्यत पोहचेल या वेतानेच पाठवावेत. विहीत मुदत संपल्यानंतर आलेला अर्ज कोणत्याही कारणास्तव विचारात घेतला जाणार नाही. त्याचप्रमाणे थेट सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**सहपत्र :- विहीत नमुन्यातील अर्ज.**

मुख्य अभियंता
अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ
नाशिक

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादीत
## अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, नाशिक
## मानव संसाधन विभाग
जाहीरात क्र. १/२०१७

उमेदवाराचा फोटो (आताच्या काळात काढलेला फोटो)

**"वरिष्ठ यंत्रचालक"** या पदासाठी अंतर्गत अधिसुचनेव्दारे भरतीकरिता अउदा प्रकल्प नि संचलन व सुव्यवस्था परिमंडल ,नाशिक येथे सादर करावयाचा अर्जाचा नमुना.
जाहीरात क्र.१/२०१७

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | कर्मचा-याचे संपुर्ण नांव | आडनाव | नाव | वडिलांचे/पत्नीचे नाव | |
| २ | | भ.नि.नि.कं. | | सॅप क. | | |
| ३ | | सध्याचे पदनाम | | | | |
| ४ | | लिंग | पुरूष | स्त्री | | |
| ५ | | वैवाहीक स्थिती | विवाहीत | अविवाहीत | विधुर | |
| ६ | | जन्म तारीख | | | | |
| ७ | | मातृभाषा | | | | |
| | अ | मराठी भाषेचे ज्ञान | होय | नाही | | |
| ८ | अ | कायमचा पत्ता | | | | |
| | ब | पत्रव्यवहराचा पत्ता | | | | |
| | क | ई-मेल आय डी | | | | |
| ९ | | जात | | | | |
| | अ | जातीचा प्रवर्ग | अ.ज / अ.जा / वि.जा.अ. / भज ब / भज क / भज ड / वि.मा.प्र / इ.मा.व / खुला | | | |
| | ब | मागासवर्गीय प्रवर्गात मोडत असल्यास जात वैधता प्रमाणपत्र वैध क्रमांक व दिनांक | होय | नाही | जात वैधता प्रमाणपत्र वैध कमांक व दिनांक | |
| १० | | मंडळात/कंपनीत हजर झाल्याचा दिनांक व त्या समयी धारण केलेले पद | | | | |
| ११ | | सध्याचे कामाचे ठिकाण | | | | |
| | अ | विभागाचे नांव | | | | |
| | ब | मंडल कार्यालयाचे नांव | | | | |
| | क | परिमंडळ कार्यालयाचे नांव | | | | |
| | ड | कार्यालयाचा फोन नं | | | | |

१२ अर्जदाराची शैक्षणीक अर्हतेची माहीती (इयत्ता १० वी पासुन)

| अ.क्र. | परिक्षेचे नाव | उत्तीर्ण झालेले वर्ष | परिक्षामंडळाचे नांव /संस्था | प्राप्त केलेले गुण | | सरासरी गुण % |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | University | मिळालेले गुण | एकुण | |
| १ | १० वी | | | | | |
| २ | १२ वी | | | | | |
| ३ | पदवीका/Diploma in Electrical Engineering | | | | | |
| ४ | इतर (काही असल्यास) | | | | | |
| | | | | | | |

१३ अनुभव (फक्त म.रा.वि.मं/महापारेषण)

| अ.क्र. | धारण केलेले पदनाम | कार्यालयाचे नांव | अनुभवाचा कालावधी | एकुण कालावधी | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासुन ते पर्यंत | वर्ष | महिने |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

सदरचा सेवाकालावधी हा सेवापुस्तकेतील नोंदीशी जुळता असावा (आवश्यक असल्यास स्वंतत्र पान जोडावे नियंत्रण अधिका-याची शिक्का व स्वाक्षरी कार्यकारी अभियंता व त्यावरील दर्जाचे अधिकारी आवश्यक)

१४ अर्जदार कुठल्या आरक्षणतुन (जातीच्या संवर्ग) अर्ज करीत आहे*

| पदाचे नाव | अ.ज. | विजा अ | इ.मा.व. | खुला |
|---|---|---|---|---|
| वरिष्ठ यंत्रचालक | | | | |

१५ अंतर्गत अधिसुचने मध्ये नमुद केलेली सर्वसाधारण अट क्र.७ नुसार मागील पाच मुल्यांकन जोडले आहे किंवा नाही

| होय | | नाही | |
|---|---|---|---|

मी प्रमाणीत करतो की वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे खरा आणि बरोबर आहे. मी असेही प्रमाणीत करतो की वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळुन आल्यास हया माहितीच्या आधारे मिळालेली नोकरी मी गमावण्यास कटीबध्द राहील व त्याबददल माझी कोणतीही तकार राहणार नाही.

दिनांक:-

(अर्जदाराची स्वाक्षरी नावासह)

ठिकाण:-

अर्जदाराचे संपुर्ण नांव:-

सध्याचे पदनाम :-

सध्याचे कामाचे ठिकाण:-

## कार्यालयाने भरावयाची माहिती

असे प्रमाणीत करण्यात येते की अर्जदाराने भरलेला तपशिल त्याच्या सेवापुस्तकाशी /कार्यालयीन दप्तराशी पडताळुण पाहिला असुन तो बरोबर आहे / योग्य त्या ठिकाणी दुरूस्ती केलेली आहे.

| अ.क्र | विषय | शेरा |
|---|---|---|
| १ | त्यांचे विरूध्द शिस्तभंग कार्यवाही प्रलंबीत किंवा चालु आहे/नाही. | |
| २ | शिस्तभंग कार्यवाही बद्दल कोठली शिक्षा उपभोगत आहे/नाही | |
| ३ | काम व वर्तणुकीचा अहवाल | |

दिनांक:-

(नियंत्रण अधिका-याची शिक्का व स्वाक्षरी)
कार्यकारी अभियंता व त्यावरील दर्जाचे अधिकारी

### अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती जोडलेल्या आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | शाळा/महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र (एल.सी/ टि.सी.) | होय | नाही | लागु नाही |
| २ | एस.एस.सी उतीर्ण प्रमाणपत्र व मार्कशीट | होय | नाही | लागु नाही |
| ३ | पदवीका परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र व मार्कशीट (Diploma in Electrical Engineering) | होय | नाही | लागु नाही |
| ४ | जातीचे प्रमाणपत्र | होय | नाही | लागु नाही |
| ५ | जात वैधता प्रमाणपत्र | होय | नाही | लागु नाही |
| ६ | इतर (काही असल्यास) | होय | नाही | लागु नाही |

सुचना :-

१ योग्य त्या ठिकाणी टिक ☑ करावे
२ अर्ज हा काळया शाईच्या पेननेच भरावा
३ अर्जदाराने पत्राव्यहाराचा पत्ता नमुद करतांना पिन कोड देणे आवश्यक आहे
४ अर्ज भरतांना खाडाखोड किंवा अक्षरास गिरवु नये
५ सदरच्या अर्जात जर खोटी माहिती आढळल्यास अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी
६ उमेदवाराचा फोटो हा सध्याच्या काळात काढलेला असावा
७ उमेदवाराने ईमेल आय डी नमुद करणे बंधनकारक आहे.
८ सर्वसाधारण अट क्र.७ नुसार मागील पाच मुल्यांकन अहवाल प्रती जोडणे आवश्यक आहे.
९ * हे चिन्ह असलेले रकाणा भरणे अनिवार्य आहे